# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD
## SUB-REGIONAL OFFICE, CHANDRAPUR

Phone: 07172-251965/272410
Fax: 07172-251965
Visit us at www.mpcb.gov.in
E-mail: srochandrapur@mpcb.gov.in

महाराष्ट्र

Sub-Regional Office
Udyog Bhavan, Ist Floor
Railway Station Road,
Chandrapur-442401

**No. MPCB / SROC / 44 / 2021** Date: 28 / 04 / 2021

To,
The Joint Director (WPC),
M. P. C. Board, Sion ,Mumbai-22.

Sub:- Minutes of Environmental Public Hearing in respect of Project of Sand Mining Proposed by District Mining Officer, Mining Department, Collector Office, Chandrapur for their proposed 28 Sandghat/Retighat.

Ref:- 1) Board's Office Order No. B-210330-FTS-0055 dated 30/03/2021 regarding Panel.
2) Public Hearing conducted on 08/04/2021 at Niyojan Bhavan, Collector Office Area, Tal. Dist. Chandrapur for the offline method. (Participants also joined online on ZOOM app).

Sir,

With reference to above cited subject matter, District Mining Officer, Mining Department, Collector Office, Chandrapur had applied to the Board for conducting Environmental Public Hearing for their Proposed Project of Project of Sand Mining of 28 Sandghat/Retighat. The Public Hearing was conducted on 08/04/2021 at Niyojan Bhavan, Collector Office Area, Tal. Dist. Chandrapur. Submitting herewith the copies of proceedings of the Public Hearing as under;

1) Minutes of Public Hearing in English & Marathi (One original Copy & one photocopy).
2) Copies of written submissions received regarding project. (3)
3) Copy of attendance sheet (both offline and online).
4) DVD of video shooting at the time of Public Hearing.
5) Office order for constitution of Public Hearing Panel.
6) Notices of Public Hearing published in English & Marathi Newspapers.
7) Executive Summary (English & Marathi).
8) EIA Report.

**It is opinion of the undersigned that while granting EC to these problematic 9 Retighats in the polluted stretch of Wainganga River, violation of order of Hon'ble NGT should not take place, Hence this above fact shall be communicated specifically to SEAC – Environment Dept., GoM.**

Yours Faithfully

(Ajit Patil)
Sub-Regional Officer, Chandrapur.

**Note:-** Out of the 28 Sand Ghats, 09 Sand Ghats are located in the Polluted River Stretch of River Wainganga, namely, Sand Ghat at Kolari, Belgaon, Arhernawargaon Chikhaldhokla, Arhernawargaon Awali, Pimpalgaon, Halda, Sakhari, Londhali, & Bormala.

Copy submitted for information to:-
1) The District Collector, District Collector Office, Chandrapur.
2) Regional Officer, M. P. C. Board, Chandrapur.
3) EIC, M. P. C. Board, Mumbai – for display on website of the Board.

Copy for information to:- District Mining Officer, Mining Department, Collector Office, Chandrapur

**चंद्रपूर जिल्हयातील वरोरा, भद्रावती, मुल, पोंभुर्णा, ब्रह्मपूरी, सिंदेवाही, गोंडपिपरी व सावली तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटांकरिता (एकुण २८) दि. ०८/०४/२०२१ रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

---

**चंद्रपूर जिल्हयातील खालील तक्त्यात नमुद केलेल्या वरोरा, भद्रावती, मुल, पोंभुर्णा, ब्रह्मपूरी, सिंदेवाही, गोंडपिपरी व सावली तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटांकरिता (एकुण २८) पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दि. ०८/०४/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता, स्थळ - नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, ता. जि. चंद्रपूर येथुन ऑफलाईन पध्दतीने नियोजन भवन येथे व ऑनलाईन पद्धतीने Zoom App द्वारे घेण्यात आली.**

| **अ.क्र.** | **प्रस्तावित वाळू घाटाची ठिकाणे** | **तालुका** |
|---|---|---|
| १ | बोरी, सोईट | वरोरा |
| २ | पिपरी दे, पारोधी, जेना निवाळी-कांशी | भद्रावती |
| ३ | चकलिखीतवाडा, चकसोमनपल्ली | गोंडपिपरी |
| ४ | चकवेलवा, घाटकुल, जामखुर्द, आष्टा, चक-बल्लारपुर-१, चक-बल्लारपुर-२ | पोंभुर्णा |
| ५ | **बेळगांव, अहेरंवरगांव चिखलढोकला, अहेरंवरगांव अवळी, पिंपळगांव, हळदा, कोलारी** | ब्रम्हपुरी (**वैनगंगा नदी**) |
| ६ | **साखरी, लोंढोली, बोरमाळा** | सावली (**वैनगंगा नदी**) |
| ७ | वासेरा, लालचिचबोडी | सिंदेवाही |
| ८ | कोसांबी, भादुर्णी, हळदी-गानोगाना, डोंगरगांव | मुल |

**टिप:-** उपरोक्त तक्ता अनुक्रमांक ५ व ६ वैनगंगा नदीच्या प्रदूषित पट्ट्यात ९ रेतीघाट येतात, त्या ९ रेतीघाटांची नावे पुढीलप्रमाणे - ब्रम्हपुरी तालुक्यातील रेती घाट-**बेळगांव, अहेरंवरगांव चिखलढोकला, अहेरंवरगांव अवळी**, **पिंपळगांव, हळदा, कोलारी**, सावली तालुक्यातील रेती घाट **- साखरी, लोंढोली, बोरमाळा**

मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. BO/JD(WPC)/PH/B-२१०३३०-FTS-००५५ दि. ३०/०३/२०२१ अन्वये सदरच्या लोकसुनावणी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) अपर जिल्हादंडाधिकारी<br>जिल्हाधिकारी, चंद्रपूर | - | **अध्यक्ष** |
| २) प्रादेशिक अधिकारी<br>म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप-प्रादेशिक अधिकारी<br>म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | - | **समन्वयक** |

श्री. अजित पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी मंचावरील मान्यवरांचे व ऑनलाईन पद्धतीने Zoom App द्वारे उपस्थित नागरिकांचे स्वागत केले. तसेच समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती केली. त्यावेळस त्यांनी असे सांगितले की, माननिय जिल्हाधिकारी व माननिय अपर जिल्हादंडाधिकारी हे दोघे कोरोना संदर्भातील महत्त्वाच्या कामात व्यस्त आहेत. समितीच्या समन्वयक यांनी माननीय जिल्हाधिकारी यांना आजची लोकसुनावणी कोणाच्या अध्यक्षते खाली घावी अशी विनंती केली. तद्नंतर जिल्हाधिकारी महोदय यांनी मौखीक रित्या असे सुचविले व आदेशित केले की, सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष, म्हणुन श्री. जे. पी. लोंढे उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर हे काम पाहतील. तद्नंतर श्री. जे. पी. लोंढे उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), हे मंचावर सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष म्हणुन उपस्थित झाले व पुढील प्रक्रिया सुरु झाली.

सर्वप्रथम समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सुचित केले की, भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि. १४/०९/२००६ व सुधारित दि. ०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक संमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

चंद्रपुर जिल्हयातील २८ वाळु घाटांमधुन वाळुचा उपसा करण्याकरीता प्रकल्प प्रर्वतक जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांनी दि. ११/०२/२०२१ रोजी रितसर शुल्क भरुन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज केला होता.

समन्वयक यांनी नमुद केले की, केंन्द्र शासनाच्या खनिजकर्म विभागाने मार्च २०१८ मध्ये Sand Mining Frame Work, २०१८ प्रसिध्द केलेले आहे. त्यामध्ये वाळु/रेती निर्गती करताना आवश्यक असणाऱ्या बाबी संदर्भात देशातील काही ठळक राज्यांचा अभ्यास करुन काही दिशा निर्देशक दिलेले आहेत. तसेच मा. राष्ट्रीय हरित लवादने (एनजीटी) यांनी ओ.ए.नं. ३६८/२०१५ मध्ये दिनांक

१९/०९/२०१८ रोजीच्या आदेशानुसार केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय,नवी दिल्ली यांच्याशी समन्वय साधून Sustainable Sand Mining Guidelines, 2016 व Sand Mining Frame Work, 2018 व 2020 नुसार धोरणात अनुकुल बदल करण्याचे व जनसुनावणी घेण्याचे निर्देश पारित केलेले आहेत.

समन्वयक यांनी असे नमुद केले की, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मुळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पविषयी व प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणुन घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदुषण नियंत्रण संयत्रणा व त्या अनुषंगाने कायदे याबाबतची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनांचा विचार करणे.

ब्रम्हपुरी तालुक्यातील वैनगंगा नदीच्या प्रदूषित पट्ट्यात पुढील ६ रेती घाट आजच्या सुनावणीमध्ये रेती उत्खननासाठी प्रस्तावित आहे, जसे की, -**बेळगांव, अहेरंवरगांव चिखलढोकला, अहेरंवरगांव अवळी, पिंपळगांव, हळदा, कोलारी**. तसेच सावली तालुक्यातील वैनगंगा नदीच्या प्रदूषित पट्ट्यात पुढील ३ रेती घाट आजच्या सुनावणीमध्ये रेती उत्खननासाठी प्रस्तावित आहे, जसे की, **- साखरी, लोंढोली, बोरमाळा.**

सबब २८ रेतीघांटापैकी ९ रेतीघाट वैनगंगा नदीच्या प्रदुषित पट्टयात आहे- (कोलारी, बेलगाव, अरहेरनवरगांव चिखलढोकला, अरहेरनवरगांव अवळी, पिपंळगांव, हळदा, साखरी, लोंढली व बोरमाळा). वैनगंगा नदीच्या प्रदुषित पट्टयात येणाऱ्या उपरोक्त ९ रेतीघाटांची नावे म.प्र.नि. मंडळाने दि. ४/०३/२०२१ रोजीच्या दै. लोकसत्ता व टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जनसुनावणीच्या जाहिरातीत उल्लेख केला होता. सबब जर या ९ रेतीघाटाला पर्यावरण विषयी परवानगी दिली आणि त्या रेतीघाटातुन रेतीचा उपसा केला तर माननीय NGT च्या आदेशाची उल्लंघन होईल, असे मत समन्वयक श्री. अजित पाटील यांनी व्यक्त केले.

म.प्र.नि. मंडळाकडे प्राप्त लोकसुनावणी घेण्याबाबतच्या अर्जाच्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांचा परवानगीने दि. ०८/०४/२०२१ रोजी चंद्रपुर जिल्हयातील वाळु घाटांबाबत पर्यावरण विषयक लोकसुनावणी घेण्याबाबत दिनांक निश्चित करण्यात आला होता. याबाबत नियमाप्रमाणे ३० दिवस अगोदर दि. ०४/०३/२०२१ रोजी मराठी दैनिक **'लोकसत्ता'** व इंग्रजी दैनिक **'टाईम्स ऑफ इंडिया'** या वृत्तपत्रात जाहिरात प्रकाशित केली होती. तसेच अधिसुचनेप्रमाणे वाळु घाटासंबंधीचे ठळक वैशिष्ट असलेल्या व प्रकल्पाबाबत माहिती असलेल्या प्रारुप पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या प्रती मराठी व इंग्रजीत शासनाच्या जाहिरातीत नमूद केलेल्या कार्यालयामध्ये इच्छिुक नागरिकांना अभ्यास करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

तदनंतर समन्वयक यांनी वृत्तपत्रातील जाहिरातीत टिप मधील पुढीलप्रमाणे ३ मुद्दे सांगितला. **१)** सदर जनसुनावणी ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येत आहे. ऑनलाईन पद्धतीसाठी Zoom App प्रणालीचा वापर करण्यात येत आहे व त्या संबंधिचा Meeting ID: ९२३ ६८३७ १६३६ व Password ५४३५४३ आहे. **२)** पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे परिपत्रक क्रं. F.No. २२-२५/२०२०-IA.III दि. १४/०९/२०२०, मधील मुद्दा क्रं. ३ (iii) नूसार ऑनलाईन पद्धतीने जनसुनावणी घेण्यात येत आहे व शासनाने विहीत केलेल्या नागरीकांचा जमाव जमा करून, सामाजिक अंतर राखून व संबंधित नियमांचे पालन करून जनसुनावणी घेण्यात येत आहे. **३)** ज्या नागरीकांना ऑनलाईन पद्धतीचा वापर करता येत नाही, अशा नागरीकांनी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे उपस्थित राहाण्याची सुध्दा सुविधा करण्यात आली होती, व त्या अनुषंगाने नियोजन भवनात २१ नागरीक उपस्थित होते. झुम प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीने १० नागरीकांनी सहभाग घेतला.

तदनंतर चंद्रपुर जिल्हयातील २८ वाळू घाटांबाबत प्रकल्प प्रवर्तक - श्रीमती अल्का खेडकर, जिल्हा खनिकर्म कार्यालय, चंद्रपूर यांनी सादरीकरणाद्वारे सविस्तर अहवाल (PPT Presentation) सादर केला. तसेच वाळू उपसा करतांना प्रदुषण नियंत्रण करतांना घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती दिली.

**सहपत्र:-**

**१) समिती गठन आदेश** - मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. BO/JD(WPC)/PH/B-२१०३३०-FTS-००५५ दि. ३०/०३/२०२१ अन्वये सदरच्या लोकसुनावणी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

**२)** ऑफलाईन **हजेरीपट**- नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे उपस्थितांची यादी (एकूण २१) **तसेच** ऑनलाईन हजेरीपट- झुम ॲपद्वारे सहभागी झालेल्या नागरीकांची यादी (एकूण १०)

**३) आक्षेप/निवेदन** - उपस्थित नागरिकांनी समितीकडे ३ लेखी निवेदन सादर केले (ग्रामपंचायत सोमनपल्ली यांचे दि. ०८/०४/२०२१ रोजी निवेदन पत्र, ग्रामपंचायत साखरी यांचे यांचे दि. ०८/०४/२०२१ रोजी निवेदन पत्र. मौजे साखरी येथील श्री. गुरुदास मारोती वनकर व इतर २९ नागरीक यांचे दि. ३१/०३/२०२१ रोजी निवेदन.

सादरीकरणानंतर समन्वयक यांनी लोकसुनावणीसाठी उपस्थित नागरिकांना व ऑनलाईन पद्धतीने सहभागी झालेल्या नागरिकांना, २८ या वाळु घाटांबाबत त्यांचे मत, टिका-टिपण्णी, आक्षेप, सुचना मांडण्याबाबत आवाहन केले. तसेच उपस्थित नागरिकांनी समितीकडे उपरोक्त नमूद केलेले ३ लेखी निवेदन सादर केले. उपस्थितांनी नोंदविलेली मते व त्याबाबतचा अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री. कवडु कुबडे, ग्रामपंचायत- चेकसोमनपल्ली, ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर:-**

| **अ. क्र.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | मी आमचे ग्रामपंचयतीचे दि. ०८/०४/२०२१ रोजीचे लेखी निवेदन आज आपणास सादर करत आहे. तसेच माझे प्रश्न पुढील प्रमाणे आहेत.<br>• रेतीघाटाच्या वाहतुकीसाठी गावातुन एकच मार्ग आहे व जड वाहतुकीमूळे रसत्यावर खड्डे पडले आहे.<br>• रेतीच्या उपसामुळे उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची समस्या उद्धवत आहे. असे माझे २ मुद्दे आहेत. | • (प्रकल्प प्रवर्तक) जिल्हा खनिकर्म कार्यालय प्रतिनिधी यांनी असे सांगितले की वाहतुकीच्या रसत्याबाबत रितसर लेखी तक्रार संबंधीत कार्यालयात करावी. रस्त्याचे दुरुस्ती व देखभाल साठी शासनाचा संबंधीत विभाग जसे की, जि. प. बांधकाम विभाग व सा. बां. विभाग यांची रस्ता सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी आहे.<br>• याबाबत रेती घाटाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर १ महिन्याच्या आत ग्रामपंचायतीची बैठक घेऊन ठराव पाठवणे गरजेचे असते. आपल्या सोमनपल्ली ग्रामपंचायतीने मंजुरी तहसिलदार व जिल्हा खनिकर्म कार्यालयाकडे सादर केलेली आहे.<br>• समन्वयक – उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपले लेखी निवेदन प्राप्त झाले आहे, व ते पर्यावरण विभागातील पर्यावरण विषयक मंजुरी देण्याऱ्या समितीकडे पाठविले जाईल. |

२) <u>श्री सुधीर शंकर पिल्लारे, सरपंच, ग्रामपंचायत- बेळगाव, ता. ब्रम्हपुरी,जि. चंद्रपूर :-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ग्रामसभेची नाहरकत परवानगी १४४ कलम लागु असल्यामुळे घेता येत नाही, सबब सद्यास्थितीत अशी मासिक सभा झाली आहे काय? | जिल्हा खनिकर्म कार्यालय प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, या पुर्वीच आपल्या ग्रामपंचायतीने मंजुरी तहसिलदार व जिल्हा खनिकर्म कार्यालयाकडे सादर केलेली आहे, म्हणुन सद्यास्थितीत नविन ग्रामसभा आयोजित करणे व प्रास्ताव सादर करण्याचा हा प्रश्न उद्भवत नाही. |

३) <u>श्री. अश्विनसिंग ठाकुर, चंद्रपूर:-</u>

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | रेतीघाटाचा लिलाव कधी होईल? | आजच्या जनसुनावणीचे इतीवृत्त तयार झाल्यावर मंजुरीसाठी पर्यावरण विभागाकडे पाठवण्यात येईल व पर्यावरणाची परवानगी मिळाल्यावर लिलाव होईल. तरी निश्चित कालावधी सांगता येणार नाही. |

४) <u>श्री. विनोद वाठोरकर, ग्रामपंचायत- पारोधी,ता. भद्रावती, जि. चंद्रपूर :-</u>

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | • परवानगी देतांना विहीर ते दत्त मंदीरच्या लगतच्या परिसरात एकुण १३ सर्वे नंबर येतात. सबब सद्यास्थितीतल पाणीपुरवठाची विहीर ते दत्त मंदीर या क्षेत्रातील वाळुचा उपसा करु नये अशी आमच्या ग्रामपंचायतीची मागणी | • जिल्हा खनिकर्म कार्यालया मार्फत जिथे जल स्त्रोत आहे तिथे वाळु उपसाची परवानगी देत नाही, तसेच नियमानुसार २०० मीटर अंतर सोडुन परवानगी देण्यात येते.<br>• रेतीघाटातुन रेतीचे उत्खनन व वाहतुक संबधी शासनाचे वाळु/रेती निर्गती धोरण दि. ०३/०९/२०१९ अन्वये ग्रामस्तरावर ग्रामदक्षता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आहे. तथापि सदर क्षेत्र वगळता इतरत्र वाळुचा उपसा करण्याची आमच्या ग्रामपंचायतीची काही हरकत नाही.<br>• रेतीची वाहतुक पारोधी गावातुन होत असल्यामुळे व त्याच मार्गावर शाळा असल्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे.<br>• रेतीघाटाचा लिलाव केल्यानंतर शासनास जो गौण खनिज निधी प्राप्त होतो त्यातील २५ टक्के रक्कम लिलाव संपल्यानंतर न देता, या आर्थिक वर्षातच आमच्या ग्रामपंचायतीला रक्कम देण्यात यावी. म्हणजेच निधी रक्कम आधी द्यावी अशी आमची मागणी आहे. | समिती गठीत केली आहे. उक्त समितीमध्ये ग्रामपंचायतीचे सरपंच अध्यक्ष, ग्रामसेवक सदस्य, पोलीस पाटील, कोतवाल व तलाठी हे सदस्य सचिव आहेत. समितीने या संदर्भात लिलावधारकाशी चर्चा करुन रस्ता उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे.<br>• शासनाच्या धोरणानुसार निधी लिलाव संपल्यानंतर वाटप होतो.<br>• शासनाचे वाळु/रेती निर्गती धोरण दि. ०३/०९/२०१९ मधील नियम IV उपनियम ४ अन्वये सर्वोच्च बोलीतील रक्कमेधुन वाळुच्या स्वामीत्वधनाची रक्कम वजा करुन, उर्वरीत रक्कमेपैकी खालील प्रमाणे रक्कम ग्रामपंचायतीस देण्यात यावे.<br>अ) लिलावाची रक्कम १.०० कोटी असल्यास २५ टक्के रक्कम.<br>ब) लिलावाची रक्कम १.०० कोटी ते २.०० कोटी असल्यास २० टक्के रक्कम तथापी किमान रु. २५,००,०००/-<br>क) लिलाचाची रक्कम २.०१ कोटी ते ५.०० कोटी असल्यास १५ टक्के तथापी किमान रु. ४०,००,०००/-<br>ड) लिलावाची रक्कम ५.०१ कोटी पेक्षा वर असल्यास १० टक्के तथापी किमान रु. ६०,००,०००/-<br>सदर रक्कम रेतीघाट कालावधी संपल्यानंतर देण्याची तरतूद आहे. |

५) **श्रीमती कल्पना शरद भोंगळे, कोटवल, ग्रामपंचायत- पारोधी,ता. भद्रावती, जि.चंद्रपूर :-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | • परवानगी देतांना विहीर ते दत्त मंदीरच्या लगतच्या परिसरात एकुण १३ सर्वे नंबर येतात. सबब सद्यास्थितीतल पाणीपुरवठाची विहीर ते दत्त मंदीर या क्षेत्रातील वाळुचा उपसा करु नये अशी आमच्या ग्रामपंचायतीची मागणी आहे. तथापि सदर क्षेत्र वगळता इतरत्र वाळुचा उपसा करण्याची आमच्या ग्रामपंचायतीची काही हरकत नाही.<br>• रेतीची वाहतुक पारोधी गावातुन होत असल्यामुळे व त्याच मार्गावर शाळा असल्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे.<br>• रेतीघाटाचा लिलाव केल्यानंतर शासनास जो गौण खनिज निधी प्राप्त होतो त्यातील २५ टक्के रक्कम लिलाव संपल्यानंतर न देता, या आर्थिक वर्षातच आमच्या ग्रामपंचायतीला रक्कम देण्यात यावी. म्हणजेच निधी रक्कम आधी द्यावी अशी आमची मागणी आहे. | • तहसील स्तरावरील तांत्रीक समिती ने याबाबतीत निकसाचे पालन करुनच रेतीघाट प्रस्तावित केले आहे. त्यामुळे प्रस्तावित सर्व रेतीघाट हे पिण्याच्या पाण्याला स्त्रोतापासुन २०० मीटर अंतराच्या पलीकडे आहेत. या मर्यादेचे उल्लंघन होत असल्यास ग्रामदक्षता समिती कार्यवाही करुन शकते व तसा प्रस्ताव तहसील व जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करु शकते.<br>• ग्राम दक्षता समितीने याबाबत तातडीने उपाययोजना करण्याबाबत व पर्यायी रस्ता उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करावी.<br>• शासनाच्या धोरणानुसार रेतीघाट कालावधी संपलयानंतर निधी देय आहे. |

६) **श्री.भोजराज धारणे, ग्रामपंचायत- बोरमाळा, ता. सावली, जि. चंद्रपूर :-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | • रेतीघाटाची मुद्दत संपत नाही, त्यामुळे निधी आधी मिळावा. | • रेतीघाट कालावधी संपण्यापुर्वी निधी देणे शासन निर्णयांचे उल्लंघन होईल. |

| | | |
|---|---|---|
| | • बोरमाळा ते व्याहाड खुर्द या रस्त्यावर रेतीघाटाच्या जड वाहतुकी मुळे रस्त्यावर खड्डे पडले आहे, ज्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. | • रस्त्याची देखभाल दुरुस्ती अथवा रस्ते बांधकाम याकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग राज्य, सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषद यांच्यामार्फत रस्त्याची मागणी करावी तसेच जिल्हा खनिज प्रतिष्ठाण अंतर्गत रस्ते बांधकामसाठी ग्रामपंचायतीनी प्रस्ताव संबधीत यंत्रणेमार्फत सादर करावा, असे कळविण्यात आले. |

**७) <u>श्री. दादाजी किनेकर, ग्रामपंचायत साखरी, ता. सावली, जि. चंद्रपुर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी आमचे ग्रामपंचयतीचे दि. ०८/०४/२०२१ रोजीचे लेखी निवेदन आज आपणास सादर करत आहेत तसेच माझे प्रश्न पुढील प्रमाणे आहेत.<br>• नाहरकत परवानगी नसतांना रेती घाट प्रस्तावित का केले?<br>• सन २००० पासुन आमच्या ग्रामपंचायतीस निधी मिळाला नाही.<br>• घाटावर अवैध वाहतुक सुरु आहे त्यामुळे रस्त्यावर खड्डे झाले आहे, त्यामुळे अपघाताची शक्यता आहे.<br>• तसेच रेतीची अवैध वाहतुक बंद कशी करता येईल. | • नाहरकत परवानगी शिवाय रेतीघाट प्रस्तावित व लिलाव होत नाही. आपल्या ग्रामपंचायतीने यापुर्वीच रेतीघाटास ग्रामसभेची मंजुरी देऊन सदर प्रस्ताव तहसिलदार व जिल्हा खनिकर्म कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब नाहरकत परवानगी नसतांना रेती घाट प्रस्तावित का केले, असा मुद्दा चुकीचा आहे.<br>• शासनाचे वाळु/रेती निर्गती धोरण दि. ०३/०९/२०१९ पासुन कार्यान्वीत आहे. यापुर्वी झालेल्या रेतीघाटाची रक्कम ग्रामपंचायतीस देय असणार नाही.<br>• अवैध रेती संबंधी ग्रामस्तरावर ग्रामदक्षता समिती आहे ज्याचे अध्यक्ष सरपंच व सदस्य सचिव तलाठी असतात. तसेच या समितीमध्ये पोलीस पाटील, ग्रामसेवक व कोतवाल असे सदस्य असतात. अवैध रेती वाहतुक आढळल्यास संबंधीत वाहनाचे वाहन क्रमांकसहीत छायाचित्र काढावे, व |

| | | |
|---|---|---|
| | | वाहन जप्त करु शकतात. या समितीला अवैध रेतीच्या गाडया अडवुन/पकडुन झाल्यानंतर वरिष्ठ अधिकारी त्यावर कारवाई करु शकतात. |

## ८) श्री प्रमोद खोबे, ग्रामपंचायत लोंढोली, ता. सावली, जि. चंद्रपुर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायतीच्या ठरावनुसार नाहरकत परवानगी घेतली आहे, तथापि वाहतुकीचा रस्ता एकच असल्यामुळे पावसाळ्यात जड वाहतुकीमुळे रस्ता खराब होतो, त्यामुळे अपघात होतो, सबब रेतीच्या जड वाहतुकी करिता गावाच्या बाहेरुन दुसरा रस्ता करण्यात यावा. | • जिल्हा खनिकर्म कार्यालय यांनी असे सांगितले की वाहतुकीच्या रसत्याबाबत रितसर लेखी तक्रार संबंधीत कार्यालयात करावी. रस्त्याचे दुरुस्ती व देखभाल साठी शासनाचा संबंधीत विभाग जसे की, जि. प. बांधकाम विभाग व सा. बां. विभाग यांची रस्ता सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी आहे. |

## ९) श्रीमती भाग्यश्री आदे, सरपंच, ग्रामपंचायत चेकलिखीतवाडा, ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपुर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | चेकलिखीतवाडा गावातुन जड वाहतुक बंद करण्यात यावी कारण अपघात होऊ शकतो. रेती वाहतुकीचा आमच्या ग्रामस्थांना त्रास होत आहे. तसेच निमनी घाटावरुन रेती वाहतुक करण्यात यावी, | आपल्या मुद्याची नोंद घेतली आहे. वाहतुकीच्या रसत्याबाबत रितसर लेखी तक्रार संबंधीत कार्यालयात करावी. रस्त्याचे दुरुस्ती व देखभाल साठी शासनाचा संबंधीत विभाग जसे की, जि. प. |

| | | |
|---|---|---|
| | अशी सुचना श्रीमती भाग्यश्री आदे यांनी मांडली. | बांधकाम विभाग व सा. बां. विभाग यांची रस्ता सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी आहे. |

१०) **श्री. हरिशचंद्र आसूटकर, ग्रामपंचायत जेना निवली कांशी,जि. चंद्रपुर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | गावातील रस्ता हा कच्चा रस्ता असल्याने पावसाळयात जडवाहतुकीमुळे खराब होतो, अपघात होण्याची शक्यता आहे. | वाहतुकीच्या रसत्याबाबत रितसर लेखी तक्रार संबंधीत कार्यालयात करावी. रस्त्याचे दुरुस्ती व देखभाल साठी शासनाचा संबंधीत विभाग जसे की, जि. प. बांधकाम विभाग व सा. बां. विभाग यांची रस्ता सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी आहे. |

११) **श्रीमती गुंजा उइके, ग्रामपंचायत जेना निवली कांशी, ता.भद्रावती, जि. चंद्रपुर :-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | • रेतीघाटाच्या उपस्यामुळे जमिनीच्या पाण्याची पातळी खालावते त्यामुळे उन्हाळयात पाण्याची टंचाई भासते. तसेच स्मशान भुमि नदीकाठावर असल्याने रेतीघाटाच्या उपस्यामुळे जमीन खचते. | • तहसील तांत्रीक समिती ही प्रस्तावित रेतीघाटाच्या सर्वेक्षनानंतर योग्य रेतीघाटाची शिफारस करते. सबब श्मशानभुमीच्या जागेवर अथवा लगतच्या नदीपात्रात रेतीघाट नाही. त्यामुळे आपला मुद्दा संयुक्तीक वाटत नाही. भुजल पातळी |

| | | |
|---|---|---|
| | • रेती वाहक वाहनांची वाहतुक जिल्हा परिषद शाळेच्या रस्त्यांनी होत असते त्यामुळे अपघातची दाट शक्यता आहे. तसेच रेतीच्या वाहतुकीमुळे जनावराचा मृत्यु सुद्धा झालेला आहे तरी संबंधित वाहनधारकांने नुकसान भरपाई दिलेली नाही.<br>• अवैध रेती वाहतुक देखील होते. | खालावण्याचा संदर्भात भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या शिफारसीनुसार रेतीघाट प्रस्तावित करण्यात येते, सबब हा मुद्दा संयुक्तीक वाटत नाही.<br>• आपल्या मुद्याची नोंद घेतली आहे. वाहतुकीच्या रसत्याबाबत रितसर लेखी तक्रार संबंधीत कार्यालयात करावी. रस्त्याचे दुरुस्ती व देखभाल साठी शासनाचा संबंधीत विभाग जसे की, जि. प. बांधकाम विभाग व सा. बां. विभाग यांची रस्ता सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी आहे.<br>• अवैध रेती वाहतुक ग्रामस्तरावर ग्रामदक्षता समिती आहे ज्याचे अध्यक्ष सरपंच व सदस्य सचिव तलाठी असतात. तसेच या समितीमध्ये पोलीस पाटील, ग्रामसेवक व कोतवाल असे संदस्य असतात. अवैध रेती वाहतुक आढळल्यास संबंधीत वाहनाचे वाहन क्रमांकसहीत छायाचित्र काढावे, व वाहन जप्त करु शकतात. या समितीला अवैध रेतीच्या गाडया अडवुन/पकडुन कारवाई साठी तलाठी मार्फत प्रस्ताव तहसिलदार यांना सादर करावा. |

**१२) श्री. अजित पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ.चंद्रपुर ता.जि. चंद्रपुर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | केंन्द्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने/राष्ट्रीय हरित लवादाने (NGT) वैनगंगा | जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी असे सांगितले की, ९ रेतीघाट वैनगंगा नदीच्या प्रदुषित पट्ट्यात |

| | | |
|---|---|---|
| | नदीतील भाग, प्रदुषित पट्टा म्हणुन घोषित केलेला आहे. सबब २८ रेतीघांटापैकी ९ रेतीघाट वैनगंगा नदीच्या प्रदुषित पट्टयात आहे- कोलारी, बेलगाव, अरहेरनवरगांव चिखलढोकला, अरहेरनवरगांव अवळी, पिपंळगांव, हळदा, साखरी, लोंढली व बोरमाळा. वैनगंगा नदीच्या प्रदुषित पट्टयात येणाऱ्या उपरोक्त ९ रेतीघाटांची नावे म.प्र.नि. मंडळाने दि. ४/०३/२०२१ रोजीच्या दै. लोकसत्ता व टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जनसुनावणीच्या जाहिरातीत उल्लेख केला होता. सबब जर या ९ रेतीघाटाला पर्यावरण विषयी परवानगी दिली आणि त्या रेतीघाटातुन रेतीचा उपसा केला तर माननीय NGT च्या आदेशाची उल्लंघण होईल. सबब यांची जवाबदारी कोण स्विकारणार? | येतात हे खरे आहे, तथापि सदर ९ ठिकाणी रेती उत्खनन हे अवैध प्रकारे करावयाचे नसुन ते वैध प्रकाराने म्हणजेच शासनस्तराव निविदा काढुन, जिल्हा खनिकर्म कार्यालय – जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर सदर प्रक्रिया करणार आहे. सबब सदर उत्खनन हे अवैध ठरु शकत नाही असे आमचे मत आहे. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी असे सांगितले की, राष्ट्रीय हरीत लवाद यांच्या निर्णयात नदी प्रदूषित पट्ट्यात अवैध रेती उत्खनन करु नये असे नमुद आहे. तसेच दि. १३/०२/२०१८ च्या महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयामध्ये प्रदूषित पट्ट्यात उत्खनन करु नये असे नमुद आहे, तथापि त्यात वैध की अवैध, या शब्दाचा उल्लेख नसल्याने Confusion निर्माण झाले आहे. |

**१३) श्री. चंद्रशेखर रामटेके, ग्रामपंचायत लोंढोली, ता.सावली, जि. चंद्रपुर**

| **अ. क्र.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | रेतीवाहतुकीची वेळ काय असते हा माझा प्रश्न आहे, कृपया त्याचे उत्तर द्यावे. | रेती उत्खननाची वेळ सकाळी ६ ते रात्री ६ अशी शासनांने नेमुन देलीली आहे. तथापि रेती वाहतुकी साठी शासनांनी वेळ नेमुन दिलेली नाही. |

(अजित पाटील)

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

(ए.एम.करे)

सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

(जे. पी. लोंढे)

उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन)

करीता अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी जिल्हाधिकारी, चंद्रपूर